# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट
# अंक २८ वा
# दिनांक -१०/०७/२०१७ ते १५/०७/२०१७
# पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.
# जावक क्रमांक ७८१७ दिनांक

---------------------------------------------------------------------------

## भाग- १ :- बदली/पदोन्नती/नेमणुक :-

## बदली:-

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/कश्रेली/बदली/हजर/२०१७/५२८२ वाशिम दिनांक १३/७/२०१७ अन्वये मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचे आदेशान्वये कश्रेली श्री.अमोल प्रभाकर खाडे यांची बुलडाणा जिल्हयातुन विनंती वरुन वाशिम जिल्हयात बदली झाल्याने त्यांना दिनांक १/७/२०१७ रोजी मा.नंतर कार्यमुक्त केले आहे.ते दिनांक ४/७/२०१७ रोजी कर्तव्यावर हजर झालेले आहेत. तसेच कश्रेली धनश्री राहुल बोंडे यांची वाशिम जिल्हयातुन पो.अ.आकोला जिल्हयात बदली झाल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी दिनांक १५/७/२०१७ रोजी कार्यमुक्त केले आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/प्र.क्र.-१११/मसुप-२०१७/५२५७/वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये महामार्ग पोलीस विभागातील प्रतिनियुक्तीवर घेण्यात येणा-या पोलीस कर्मचा-यांचे निवड प्रक्रीये बाबत लेखी चाचणी घेण्याबाबत कळविले आहे. सदरची लेखी चाचणी दिनांक १४/७/२०१७ रोजी दुपारी १२.०० ते १३.०० वाजेपर्यंत जुने पोलीस मुख्यालय वाशिम येथे घेण्यात येणार असल्याने आमचे अध्यक्षते खाली खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१) श्री.किरण धात्रक पोलीस उपअधिक्षक(मुख्या) वाशिम.
२) श्री.शिवाजी ठाकरे पोलीस निरीक्षक कल्याण शाखा.
३) श्री.देविदास इंगळे राखीव पोलीस निरीक्षक पो.मु.वाशिम.

सदर पोलीस अधिकारी यांनी आमचे कक्षात दिनांक १३/७/२०१७ र ोजीचे सकाळी १०..०० वाजता न चुकता उपस्थित रहावे.

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/पोउपनि/मानेकर/बदली/हजर/२०१७/५२७५ वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये तसेच मा.विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती यांचे आदेशान्वये पोउपनि श्री.अनिले निळकंठराव मानेकर यांची अकोला ते वाशिम अशी विनंती वरुन बदली झाल्याने त्यांना पोलीस अधिक्षक अकोला यांनी दिनांक २९/६/२०१७ रोजी बदलीवर कार्यमुक्त केले आहे.त्यानुसार पोउपनि श्री.अनिले निळकंठराव मानेकर हे वाशिम जिल्हयाचेआस्थापनेवर दिनांक ५/७/२०१७ रोजी हजर झाले आहेत.

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/५३०२/२०१७ वाशिम दिनांक १४/७/२०१७अन्वये खालील नमुद कश्रेली यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे विनंती वरुन बदलीने नेमणुका करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिपीकाचे नांव | कोठुन | कोठे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.अमोल प्रभाकर खाडे कश्रेली | नव्याने हजर | अर्जशाखा/माहिती आधिकारी | बदलीवर हजर |
| २ | श्रीमती मिना विलास राजपुत वश्रेली | अर्जशाखा/माहिती आधिकारी | आवक लिपीक | विनंती वरुन |
| ३ | श्रीमती संध्या इंगोले कश्रेली | आवक लिपीक | भनिनि लिपीक | विनंती वरुन |

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/सपोनि गाठे/बदली हजर/२०१७/५३१३ वाशिम दिनांक १४/७/२०१७ अन्वये मा.अपर पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे आदेशान्वये पोलीस निरीक्षक श्री.राजेश रामकृष्ण गाठे यांची सार्वत्रीक बदल्या-२०१७ अंतर्गत महामार्ग सुरक्षा पथक उमरखेड जि.यवतमाळ येथुन प्रशासकीय कारणास्तव अमरावती परीक्षेत्रामध्ये नेमणुक झाल्याने ते दिनांक २६/६/२०१७ रोजी अमरावती परीक्षेत्रीय कार्यालयात हजर झाले.

मा.विपोमनि अ.प.अमरावती यांचे आदेशान्वये सार्वत्रिक बदल्या-२०१६/२२८३ दि. १४/६/२०१७ अन्वये पोउपनिश्री. गणपत गोविंद ढवळे यांची नेमणुक वाशिम जिल्हयात करण्यात आल्याने ते दिनांक ८/७/२०१७ रोजी हजर होण्यासाठी आले आहेत.त्यांना हजर करुन घेण्यात आले असुन त्यांची तात्पुरती नेमणुक पो.स्टे.नियंत्रण कक्ष वाशिम येथे करण्यात येत आहे.

## पदोन्नती:-

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/वश्रेली/प्रली/पदोन्नती/वनारे/२०१७/५३१६ वाशिम दिनांक १४/७/२०१७ अन्वये प्रमुख लिपीक श्री.दिगांबर काशिराम वनारे पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ येथुन पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम अशी पदोन्नतीवर प्रमुख लिपीक म्हणुन दिनांक १२/६९/२०१७ रोजी मा.पुर्व हजर झालेले आहेत. त्यांची शासन निर्णय वित्त विभाग दि.६/११/१९८४ मधिल तरतुदी नुसार पदोन्नत पदावर वेतन निश्चीती करण्या करीता कनिष्ठ पदावर देय वेतनवाढीनंतर पदोन्नतीच्या पदावर वेतन निश्चीती करण्या बाबत विकल्प दिला असल्याने त्यांची वरीष्ठ श्रेणी लिपीक या पदावर खालील नमुद केल्या प्रमाणे वेतन निश्चीती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | वेतन | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|
| १ | वरीष्ठ श्रेणी लिपीक या पदावरील सध्याचे वेतन दि.१/७/२०१६ चे वेतन | ११२९०२ | २४०० |
| २ | कनिष्ठ पदावरील वेतनवाढ दिल्यानंतर पदोन्नत पदावर वेतननिश्चीती करण्याचा विकल्प दिल्याने १२/६/२०१७ चे प्रमुख लिापीक पदाचे वेतन | ११२९० | ४२०० |
| ३ | कनिष्ठ पदावरील वेतनवाढ दिल्यानंतर पदोन्नत पदावर वेतननिश्चीती करण्याचा विकल्प दिल्याने १/७/२०१७ चे वरीष्ठ श्रेणी लिपीक पदाचे वेतन | ११७०० | २४०० |
| ४ | दि.१/७/२०१७ रोजीचे वरीष्ठ श्रेणी लिपीक या पदावरील वेतननिश्चीती नंतरचे वेतन | १२१३० | ४२०० |
| ५ | पुढील वेतन वाढीचा दिनांक | १/७/२०१८ | |

## नेमणुक :-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/श्वान हस्तक/नेमणुक/५३१०/२०१७ वाशिम दिनांक १४/७/२०१७ अन्वये पोशि/६०१ प्रदिप आंभोरे नेमणुक पो.स्टे.कारंजा शहर यांचे विनंती नुसार पो.स्टे.कारंजा शहर ते श्वान पथक वाशिम येथे श्वान हस्तक म्हणुन नेमणुक करण्यात आली होती.नमुद कर्मचारी यांनी विनंती अर्ज सादर करुन त्यामध्ये नमुद केले आहे की त्यांची श्वान हस्तक म्हणुन झालेली बदली रदद होणे बाबत विनंती केलेली आहे. पोशि/६०१ प्रदिप आंभोरे नेमणुक पो.स्टे.कारंजा शहर यांचे विनंती नुसार बदली रदद करुन त्यांचे जागी विनंतीनुसार पोशि/२१३ गणेश ढोरे नेमणुक पो.स्टे.कारंजा ग्रामीण यांची श्वान पथक वाशिम येथे श्वान हस्तक म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.त्यांची विनंतीवरुन बदली असल्याने त्यांना पदग्रहण अवधि व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

## भाग-२ रजा

आदेश क्रमांक पोअवा/आली-३/अर्जित रजा/पो.कर्मचारी/५१८७/२०१७ वाशिम दिनांक १०/७/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची ३० दिवस वाढीव अर्जित रजा मिळणे बाबतची विनंती केल्याने त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव,पदनाम व ब.नं. | नेमणुक | रजेचे कारण | मंजुर रजेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१०६१ शुभांगी नाईक | कारंजा शहर | स्वत:चे आजारा करीता | ३० दिवस प्लेन रजा |
| २ | मपोशि/११२८ रेश्मा ठाकरे | स्थागुशा | सास-याचे आजाराकरीता | ३० दिवस प्लेन रजा |
| ३ | मपोना/१४६६ प्राजक्ता कावळे | स्थागुशा | पतीचे आजारा करीता | ३० दिवस प्लेन रजा |

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/अ.र.रोखीकरण/पो.अधिकारी/२०१७/५२८७ वाशिम दिनांक १३/७/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजा व रोखीकरण वित्तीय वर्ष २०१७-२०१८ करीता १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस प्रत्यार्पीत रजा मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी नांव व नेमणुक | रजेचा तपशिल | मुळवेतन+ग्रेड पे |
|---|---|---|---|
| १ | पोनि श्रीराम गणपतराव घुगे जिवीशा वाशिम | ३० दिवस अर्जित रजा व १५ दिवस रोखीकरण | २३०४०+५०००/- |
| २ | पोनि शिवाजी भिमराव घुगे टिएमसी सेल वाशित | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रोखीकरण | २२५७०+५०००/- |
| ३ | सपोनि योगीता काशिनाथ भारद्वाज पो.स्टे.अनसिंग | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रोखीकरण | १३४५०+४४००/- |
| ४ | सपोनि आर.जी.शेख पो.स्टे.जऊळका | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रोखीकरण | १३४५०+४४००/- |
| ५ | पोउपनि विशाल हिवरकर वाचक उपविपोअ वाशिम | १५ दिवस अर्जित रजा व १५ दिवस रोखीकरण | ११९३०+४३००/- |
| ६ | परी.पोउपनि अमोल जाधव पो.स्टे.आसेगांव | ३० दिवस अर्जित रजा व १५ दिवस रोखीकरण | १०१००+४३००/- |

आदेश क्रमांक पोअवा/आली-३/पोना-१०७२/सिक-हजर/५२६०/२०१७वाशिम दिनांक १२/७/२०१७अन्वये पोना/१०७२ प्रकाश कांबळे नेमणुक पो.स्टे.शिरपुर हे सिक मधुन कर्तव्यावर हजर होणेकामी आज्ञांकीत कक्षात आले असता दि.१२/७/२०१७ रोजी मा.नंतर पासुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यांचा सिक कालावधिचा कार्यकाळ परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/रापोनि इंगळे/अ.रजा/२०१७/५२९५ वाशिम दिनांक १३/७/२०१७ अन्वये रापोनि श्री.देविदास काशिराम इंगळे पो.मु.वाशिम यांना मंजुर असलेली अर्जित रजा दिनांक १४/७/१७ ते २८/७/२०१७ पावेतो मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह उपभोगण्याची परवानगी देण्यात येत आहे.त्यांचे रजा कालावधित पोनि सुरेश हरिभाऊ नाईकनवरे नि.कक्ष वाशिम हे पाहतील.

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/अर्जित रजा-रोखीकरण/२०१७-२०१८/पो.कर्मचारी/५२२६/२०१७ वाशिम दिनांक ११/७/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार वित्तीय वर्ष २०१७-२०१८ करीता १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची मंजुरी देण्यात येत आहे.त्यांचे ब.नं.३३, ७३, ८२, १७९, ३२९, ३४०, ३९८, ४०६, ४४८, ४६०, ४६३, ५५०, ५९७, ६६७, ७१०, ७१३, ७२८, ७३४, ७४१, ७४४, ७४८, ७८८, ७९६, ८११, ८५५, ९२३, ९७४, ९८६, १०१९, १०६३, १०७१, १११८, ११७५, १२४५, १२४६, १२५१, १२९३, १२९७, १३१६, १३१८, १३५१, १३६३, १४०४, १४१०, १४३०, १४३१, १४३२, १४६७, १४७१,.

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/अर्जित रजा-रोखीकरण/२०१७-२०१८/पो.कर्मचारी/५२२७/२०१७ वाशिम दिनांक ११/७/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार वित्तीय वर्ष २०१७-२०१८ करीता १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची मंजुरी देण्यात येत आहे.त्यांचे ब.नं.४६, ९१, ९३, १५५, १९४, ३५६, ३८९, ४१४, ४२९, ४३८, ४९१, ५५४, ६१३, ७७६, ८२२, ८२४, ८५०, १२२७, १३०२, १४०९, १४५२, १४६२, १४६३,.

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/सिक रजा/मयत/पोहवा-४४३/५२६३/२०१७ वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये मयत पोहवा/४४३ गजानन नागरे तत्कालीन नेमणुक पो.मु. वाशिम यांचे दिनांक १०/०२/२०१७ ते २२/०२/२०१७ पावेतो १२ दिवस सिक कालावधिची परावर्तीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/सिक रजा /मयत/मुदतपुर्व से.नि.सपोउपनि-२५७/५२६२/२०१७ वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये मुदपुर्व से.नि.सपोउपनि/२५७ भगवान झिंग्राजी तायडे तत्कालीन नेमणुक पो.मु.वाशिम यांचे दि.२२/१२/२०१६ ते २८/४/२०१७ पावेतो १२८ दिवस सिक कालावधिची खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

१) दिनांक २२/१२/२०१६ ते ३/१/२०१७ पावेतो १३ दिवस परावर्तीत रजा.
२) दिनांक ४/१/२०१७ ते ३०/३/२०१७ पावेतो ७६ दिवस अर्जित रजा.
३) दिनांक ३१/३/२०१७ ते २८/४/२०१७ पावेतो २९ दिवस विनावेतन रजा.

## भाग -३ :- बढती/पगार. :-निरंक

## भाग -४ :- बक्षिस:- निरंक.

## भाग -५ :- शिक्षा/परवानगी :-

## शिक्षा- :-

आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोकॉ-९८२/२०१७-५२७२वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये कसुरदार पोकॉ विजय गंगावने ब.नं. ९८२ नेमणुक पो.स्टे.शिरपुर आपण पोस्टे.वाशिम येथे नेमणुकीस असतांना आपले वडील व भाऊ यांचेसह आपली पत्नी महिला पोलीस सौ.प्रिती गंगावणे हिस वेळोवेळी मारहान करुन शारीरीक व मानसिक त्रास दिला त्यावरुन त्यांनी दि.४/३/२०१० रोजी पो.स्टे.वाशिम येथे आपणा सर्वा विरुध्द एन.सी.क्रमांक २१०/२०१० कलम ३२३, ५०४, ५०६,३४ भांदवी प्रमाणे नोंद घेण्यात आली.त्यानंतर दि. २/५/२०१० रोजी आपले वडील भाऊ यांनी त्यांना मारहान करुन विषारी औषध पाजुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. आपले पत्नीने दिलेल्या रिपोर्ट वरुन अपनंबर १६६/२०१० कलम ३०७, ४९८, अ ३४ भांदवी प्रमाणे पो.स्टे.वाशिम येथे दिनांक १२/५/२०१० रोजी गुन्ह ा दाखल आहे.या वरुन आपण आपले पत्नीस आपले वडीलांची सदर गुन्हयातुन जामीन होत नसल्याने रिपोर्ट मागे घेण्यास सांगीतले व या कारणा वरुन आपण पत्नीस लाथाबुक्क्यांनी मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली. यावरुन आपणा विरुध्द पो.स्टे.वाशिम शहर येथे एनसी क्रं.६९८/२०१० कलम ५०४,५०६,३२३,भांदवी प्रमाणे नोंद आहे.दिनांक १३/८/२०१० रोजी आपले पत्नीस पुन्हा आपले वडील व भावाविरुध्द केस मागे घेण्याचे कारणावरुन पुन्हा मारहान केली व आपले पत्नीचे संपुर्ण कागदपत्रे घेवुन गेले. यावरुन आपले पत्नीने दिलेल्या रिपोर्ट वरुन पो.स्टे.वाशिम स्टेडा साना नं.४६/२०१० दिनांक १३/६/२०१० रोजी नोंद करण्यात आली आहे.दिनांक १७/६/२०१० रोजी त्यावरुन आपले विरुध्द पो.स्टे.वाशिम येथे अपनं १६६/२०१० कलम ३०७,४९८(अ) ३४, भांदवी प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.अशा प्रकारे कसुरदार तुम्ही पोलीस दलातील शिस्तप्रिय पदावर कार्यरत असतांना नैतिक अध:पतना सारखे आपले हे वर्तन पोलीस खात्यास अशोभनिय असुन त्यामुळे पोलीसांची प्रतिमा मलीन केल्याचे आढळुन आले आहे. नमुद दोषारोपात कसुरीचे संबंधाने आपणास देय होणारी वार्षीक वेतनवाढ ०२ वर्षाचे कालावधिसाठी (पुढील वेतनवाढीवर काहीएक परीणाम न होता) रोखण्याची शिक्षा कायम करण्यात येत आहे. जर कसुरदाराचे सदर आदेशाने समाधान झाले नसल्यास व त्यांना सदर आदेशा विरुध्द अपील अर्ज करावयाचा असल्यास ते तसा अपील अर्ज मा. वि.पो.म.नि. अमरावती यांचेकडे सदरचा आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाचे आत सादर करु शकता.

## परवानगी :-

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/परवानगी/घर प्लॉट/५३५३/२०१७ वाशिम दिनांक १५/७/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार मनासे (वर्तणुक)नियम १९७९मधिल पोटनियम क्रमांक १९(२) ते ५ व स्पष्टीकरण क्रमांक ५(२) मधिल अटीच्या आधिन राहुन प्लॉट/तयार घर खरेदीची परवानगी देण्यात येत आहे.तसेच

आपणास कोणत्याही संस्थेकडुन घेतलेल्या कर्जाची/बँक कर्जाची परतफेडीची हे कार्यालय कोणत्याही प्रकारची हमी घेणार नाही याची नोंद घ्यावी.परवानगी दिलेल्या पोलीस कर्मचा-यांचे ब.नं. २४, १९६, २६७, २७५, २८३, ३२४, ४४५, ४९८, ५९४, ६१६, ६४९, ७५२, ८९०, ८९९, ९३५, ९४६, ९५३, ९९१, १००५, १००६, १००७, १००९, १०२१, १०४७, १०८२, ११३५, १२४८, १२४९, १२९९, १३६०, १४२१,.

आदेश क्रमांक पोअवा/आस्था/परवानगी/मो.सा./५३५४/२०१७ वाशिम दिनांक १५/७/२०१७ अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे विनंती नुसार मनासे (वर्तणुक)नियम १९७९मधिल पोटनियम क्रमांक १९(२) ते ५ व स्पष्टीकरण क्रमांक ५(२) मधिल अटीच्या आधिन राहुन मो.सा./चार चाकी वाहन/संगणक खरेदीची परवानगी देण्यात येत आहे.तसेच आपणास कोणत्याही संस्थेकडुन घेतलेल्या कर्जाची/बँक कर्जाची परतफेडीची हे कार्यालय कोणत्याही प्रकारची हमी घेणार नाही याची नोंद घ्यावी.परवानगी दिलेल्या पोलीस कर्मचा-यांचे ब.नं.३२७, ५७९, ६००, ६४५, ८३४, ११५४,.

## भाग -६ :- निलंबन/प्रशिक्षण व इतर :-

## निलंबन :-

## प्रशिक्षण:-

क्रमांक पोअवा/आशा-४/सायबर सेल प्रशिक्षण/नागपुर/निवड/पो.अधिकारी/कर्मचारी/२०१७ /५२६६ वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये सहाय्यक पोलीस आयुक्त(सायबर)नागपुर शहर यांचे पत्र क्रमांकक्पोउपआ/आर्थिक/नाग/सायबर परिषद/१७/३०५ दिनाक ०६/०७/२०१७.अन्वये दिनांक १४ व १५जुलै २०१७ रोजी नागपुर शहर येथे महाराष्ट्र राज्यस्तरीय सायबर सेल चे प्रशिक्षण नागपुर शहर सायबर सेल येथे दिनांक १४/७/२०१७ ते १५/७/२०१७ पावेतो आयोतील करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणा करीता पोशि/९९ प्रशांत चौधरी सायबर सेल वाशिम यांचे नामनिर्देशन देण्यात आलेले होते. सदर आदेशामध्ये अंशत: बदल करुन त्यांचे ऐवजी खालील नमुद पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी नांव | पदनाम/नेमणुक | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १ | श्री.रविंद्र देशमुख | पोलीस निरीक्षक सायबरसेल वाशिम. | ९८८१६३७७७९ |
| २ | अमोल काळमुंदळे | पोशि/ब.नं ११२९ संगणक कक्ष वाशिम | ९५५२५२९२११ |

३/- वर नमुद सायबर सेल मध्ये कार्यरत अधिकारी/पोलीस कर्मचारी यांनी दिनांक १३/०७/२०१७ चे २०.०० पावेतो नागपुर शहर सायबर सेल येथे न चुकता रिपोर्ट करावा.

क्रमांकपोअवा/आशा-४/प्रशिक्षण/INSER BATCH-NO-७३/नाशिक/निवड-०२/पुरुष कर्मचारी/आसेगांव/२०१७ वाशिम दिनांक :-१५/७/२०१७अन्वये पोलीस अधिक्षक/प्राचार्य गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नाशिक यांचे बिनतारी संदेश क्रमांक ISC-२/DTC/२२६३/INSER.BATCH NO/७३/२०१७ DATE १३/७/२०१७ अन्वये सत्र क्रमांक ७४ "मालमत्तेच्या गुन्हयांचा आणि वाहतुक अपघात प्रकरणे व वाहतुक आणि पोलीस तपासात अंगुलीमुद्राचे महत्व "आणि वाहतुक अपघात प्रकरणे व वाहतुक आणि पोलीस तपासात अंगुलीमुद्राचे महत्व " या विषयाचे प्रशिक्षण दिनांक २५/७/२०१७ ते दिनांक २९/७/२०१७ पावेतो ५ दिवसाचे प्रशिक्षण गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे आयोजीत करण्यात आलेले आहे.

२/- सदरचे प्रशिक्षणा करीता खालील नमुद पो.स्टे. चे ०२ कर्मचारी निवड करुन पाठविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी निवड | प्रशिक्षण ठिकाण | प्रशिक्षण खर्च |
|---|---|---|---|
| १ | पो.स्टे.आसेगांव ०१ पोलीस कर्मचारी पाठवावे.(फक्त पुरुष) | गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नाशिक. | प्रत्येकी रक्कम रु.१७००/-(रुपये एक हजार सातशे मात्र) |

३/- प्रभारी अधिकारी पो.स्टे.मानोरा यांनी पो.स्टे.ला तपास करणारे तपासी अंमलदार किंवा त्यांचे मदतनिस तसेच पो.स्टे.ला असलेले पोलीस अधिकारी यांचे दप्तरी (फक्त पुरुष) पोलीस कर्मचारी यांचे पैकी ०२ कर्मचा-यांची निवड

करुन त्यांना प्रशिक्षणा करीता वेळेवर रवाना करावे. तसेच निवड करण्यात आलेल्या कर्मचारी यांनी गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र नाशिक येथे दिनांक ३१/०७/२०१७ रोजी २०.०० वा पावेतो न चुकता हजर रहावे.

क्रमांक:-पोअवा/आशा-४/खंडाळा/ B.I.T.C./प्रशिक्षण/निवड-२ कर्मचारी/२०१७,/५३०३ वाशिम दि:-१४/७/२०१७ अन्वये प्राचार्य खंडाळा यांचे पत्र क्रमांक पशा-१/DSB/सेअप्र/खंडाळा/२७७० दि.११/०७/२०१७. अन्वये पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे "Basic Intelligence Trade Craft" चे प्रशिक्षण दि.१७/०७/२०१७ ते दिनांक २१/७/२०१७ पावेतो ५ दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे.

सदर प्रशिक्षणा करीता खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना पाठविण्यात येत आहे.

१) उपविभागीय पोलीस अधिकारी कार्या.कारंजा -०१ पोलीस कर्मचारी.(गोपनिय/खुपीया/मिल स्पेशल)

२) पो.स्टे.अधिकारी मालेगांव-०१ पोलीस कर्मचारी.(गोपनिय/खुपीया/मिल स्पेशल)

वर नमुद अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त असलेले गोपनिय/खुपीया/मिल स्पेशल म्हणुन कामकाज पाहणारे किंवा त्यांचे मदतनिस कर्मचारी ज्यांची पोलीस शिपाई पदावर किमान ५ वर्ष सेवा पुर्ण,झालेली असुन ते पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक (फक्त पुरुष पोलीस कर्मचारी) यांचेपैकी प्रत्येकी-०१ कर्मचारी निवड करुन पाठविण्यात यावे. तसेच ज्या पोलीस कर्मचाऱ्यांची सेवा फक्त तिन वर्षे शिल्लक आहे अशा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणास पाठवु नये याची नोंद घ्यावी.

सदर प्रशिक्षणा करीता निवड करण्यात आलेल्या पोलीस कर्मचारी यांना पोलीस प्रशिक्षण केन्द्र खंडाळा येथे एक दिवस अगोदर दिनांक १६/०७/२०१७ चे १२.०० वा पर्यंत पोहचतील या बेताने रवाना करुन तसा पुर्तता अहवाल व कर्मचारी नाव, ब.नं.रवाना ता.वेळे सह या कार्यालयास न चुकता सादर करावा.

क्रमांक पोअवा आशा-४/खंडाळा/निवड-६ कर्मचारी/पो.स्टे.वाशिम शहर,अनसिंग,कारंजा ग्रामीण/२०१७/५३०४ वाशिम दिनांक :-१४/७/२०१७ अन्वये मा.अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा.मुंबई यांचे आदेशान्वये तसेच प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा यांचे पत्र क्रमांक २७७१/२०१७ दिनांक ११/०७/२०१७ अन्वये.पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे " MODULE I,II,III." या विषयाचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिनांक १७/७/२०१७ ते दि.२१/७/२०१७ पावेतो ५ दिवसाचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आलेले आहे.

२/- सदरचे प्रशिक्षणा करीता खालील नमुद पो.स्टे.चे पुरुष पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात येत आहे.

१) पो.स्टे.वाशिम शहर येथील-०२ कर्मचारी पाठवावे.

२) पो.स्टे.अनसिंग येथील ०२ कर्मचारी पाठवावे.

३) पो.स्टे.कारंजा ग्रामीण येथील ०२ कर्मचारी पाठवावे. वर नमुद ठाणेदार यांनी आपले अधिनस्त कामकाज करणारे तपासी अंमलदार किंवा त्यांचे मदतनिस यांचेपैकी प्रत्येकी ०२ पुरुष पोलीस कर्मचारी यांची निवड करुन त्यांना दिनांक १६/०७/२०१७ चे २०.०० वा पावेतो न चुकता हजर राहणे बाबत निर्देश देवुन त्यांना रवाना केले बाबतचा पुर्तता अहवाल त्यांचे नांव ब.नं.,रवाना ता.वेळेसह तात्काळ या कार्यालयास सादर करावा.तसेच नमुद प्रशिक्षणा करीता कर्मचारी वेळेचे आत हजर न झाल्यास आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.

टिप:- नमुद प्रशिक्षणा करीता ज्या कर्मचा-यांची सेवा ५ वर्ष पुर्ण झालेली आहे.व ज्यांनी अद्याप पावेतो खंडाळा येथे प्रशिक्षण केलेले नाही असेच कर्मचारी पाठविण्यात यावे.

तसेच ज्या कर्मचा-यांची सेवा फक्त ०३ वर्ष शिल्लक आहे अशा कर्मचा-यांना पाठविण्यात येवु नये.

## इतर :-

आदेश क्रमांक पोअवा/आली-२/प्रोत्सा भत्ता/२०१७-२०१८/५२६८/२०१७ वाशिम दिनांक १२/७/२०१७ अन्वये पोलीस बलातील विहीत शारीरीक क्षमताधारक पोलीस आधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ता योजना राबविण्यासाठी पोलीस अधिक्षक वाशिम यांचे आस्थापनेवरील नेमणुकीस असलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील पात्र पोलीस कर्मचारी **८८७** यांना शारीरीक क्षमताधारक हे संदर्भिय शासन निर्णयातील नमुद अटी व शर्तीच्या नुसार दरमहा रु.२५०/-(दिनांक

०१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८) या वित्तीय वर्षासाठी मासिक प्रोत्साहन भत्ता प्रत्येक दरमहा रुपये २५०/- प्रमाणे त्यांचे वेतना सोबत देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.सदरचा खर्च वेतन या लेखाशिर्षा खाली प्राप्त वित्तीय वर्ष २०१७-२०१८ करीता प्राप्त अनुदानातुन भागविण्यात यावा.

sd-
(मोक्षदा पाटील)
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणकक विभाग नेटवर प्रसिध्दी देणे कामी.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर"सर्वांककरीता उपलब्ध करुन देण्याात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संके तस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस/सि.बी.-१ लिपीकक यांना योग्य क्कार्यवाहीस.

*****************